# महाराष्ट्र शासन

मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य.

कोकण भवन,सहावा मजला,नवी मुंबई ४०० ६१४

☎-०२२,२७५७१३११.

🖷:- ०२२,२७५७१३११.

E.Mail:- calfak6@yahoo.com


३९५

गुप्त

क्र.स्था.१८/ब/कार्यालयीन आदेश/१३५

दिनांक: 6 OCT 2008

## कार्यालयीन आदेश

विषय:- ग्रामपचांयतीच्या थकीत लेखापरिक्षणाच्या जलद निपटाऱ्यासाठी करावयाची कार्यवाही.

ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षणाच्या मोठया प्रमाणावरील थकीत कामाबाबत शासन स्तरावर गंभीर दखल घेण्यात आली असून नुकत्याच झालेल्या विधीमंडळ अधिवेशनात त्या अनुषंगाने काही तारांकित प्रश्न विचारण्यात आले होते. हया थकीत लेखापरीक्षणाच्या निपटाऱ्यासाठी आणखी मनुष्यबळ उपलब्ध व्हावे म्हणून शासन स्तरावर झालेल्या निर्णयानुसार ग्राम विकास विभागाचे परिपत्रक क्र.लेखाप-२००७/प्र.क्र.७१२/वित्त-४ दिनांक २४ सप्टेंबर २००८ अन्वये जिल्हा परिषदेकडील विस्तार अधिकारी दर्जाचे किमान २ कर्मचारी स्थानिक निधी लेखापरीक्षण विभागाकडे ग्रामपंचायतीच्या थकीत लेखापरीक्षणाच्या निपटाऱ्यासाठी देणे बाबत आदेश प्रस्तृत झाले आहेत. त्याचबरोबर याबाबत जलद निपटाऱ्याच्या दृष्टीने ग्रामपंचायत लेखापरीक्षणाच्या निकषामध्ये थकीत लेखापरीक्षण (सन २००६.०७ पर्यतचे) निपटारा होईपर्यत किंवा मार्च २०१० पर्यंत, यापैकी जे आधी असेल त्यानुसार, सुधारणाबाबत पुढील प्रमाणे सूचना (संपूर्ण वर्षांचे तपशीलवार लेखापरीक्षणा ऐवजी ) देण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | रु.५ लाखापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायती | बांधकाम/योजने वरील जमा- खर्च पूर्ण तपासावे. उर्वरित जमा-खर्वातील ३ निवडलेल्या महिन्यांचे तपशिलवार लेखापरीक्षण करावे व राहिलेल्या ९ महिन्यांच्या जमा- खर्चाचे पुर्नविलोकन ( Review) करावे. |
| २ | रु. २ ते ५ लाखाच्या दरम्यान उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायती | बांधकाम/योजनावरील जमा-खर्च पूर्ण तपासावेत. उर्वरित जमा-खर्चापैकी ४ निवडलेल्या महिन्याचे तपशिलवार लेखापरीक्षण करावे व राहिलेल्या ८ महिन्याच्या जमा- खर्चाचे पुर्नविलोकन (Review) करावे . |
| ३ | रु.२ लाखापर्यंत उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायती | बांधकाम/योजना वरील जमा- खर्च पूर्ण तपासावेत. उर्वरित जमा-खर्चा पैकी ६ महिन्याचे तपशिलवार लेखापरीक्षण करावे व राहिलेल्या ६ महिन्याच्या जमा-खर्चाचे पुर्नविलोकन (Review) करावे. |

वरील प्रमाणे तपशिलवार लेखापरीक्षणाच्या महिन्यांमध्ये मार्च हा महिना अपरीहार्यपणे